# नगरमध्ये विश्वेश्वरैय्या जयंती उत्साहात साजरी



**अहमदनगर :** भारतरत्न डॉ. विश्वश्वरैया यांच्या जयंतीनिमित्त (इंजिनिअर्स डे) येथील शासकीय तंत्रनिकेतनामध्ये 'डिप्लोमा नंतर काय ... आणखी बरंच काही...' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्‌घाटन प्राचार्य एस. व्ही. केरकळ यांनी दिपप्रज्वलनाने केले आणि डॉ. विश्वश्वरैय्यांच्या प्रतिमेचे पूजन केले.

प्रा. विजय नवले यांनी आपल्या व्याख्यानात डिप्लोमानंतरच्या विविध क्षेत्रातील संधी विद्यार्थ्यांसमोर मांडल्या ते म्हणाले, 'ज्या विद्यार्थ्यांना शासकीय सेवेत कार्य करावयाचे आहे. डिप्लोमानंतर कोणत्याही शाखेची पदवी पूर्ण करुन ते नंतर MPSC, UPSC परिक्षा देऊनही या सेवेमध्ये दाखल होऊ शकतात. तसेच डिप्लोमानंतर नोकरी करतही ए.एम.आय.ई. सारख्या माध्यमाद्वारे उच्च शिक्षण घेऊ शकतात.

पुढे बोलताना त्यांनी काही यशस्वी विद्यार्थ्यांची उदाहरणे दिली व डिप्लोमाच्या आधाराबर देशासाठी योगदान देण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन केले. यानंतर वक्त्यांनी ५०० हून अधिक संख्येने जमलेल्या विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधान केले.